Computer

जिल्हा व सत्र न्यायालय, बीड
जा. कमांक / न्या. वि. / 10660 / 2026
दिनांक :29 / 10 / 2026

:: कार्यालयीन आदेश ::

जिल्हा न्यायालय, न्याय विभाग, बीड यांचे कार्यालयीन आदेश कमांक 9496/2026, दिनांक 30/09/2026 रोजीचे आदेशामध्ये अंशतः बदल करण्यात येत असून, निम्नस्वाक्षरीकार जामीन अर्ज/ रिमांड कामाकाजाचे कार्यभाराबाबत खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहेत.

| अ.क | रिमांडचाकामाचा व जामीन अर्जाचा कार्यभार ठेवण्यात आलेल्या न्यायालयाचे नाव | कलम | पोलीस ठाणे |
|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) |
| 1 | मा. श्रीमती एस. आर, शिंदे, जिल्हा न्यायाधीश–1 तथा अति. सत्र न्यायाधीश, बीड | महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण कायदा (MCOCA) चे नियमित, अटकपुर्व जामीन अर्ज व रिमांड. | सत्र न्यायालय, बीड चे न्यायिक कार्यक्षेत्रातील सर्व पोलीस ठाणे. |
| | | तसेच इतर विशेष व भा.दं.वि व बी.एन.एस.एस. प्रमाणे दाखल होणारे नियमीत व अटकपुर्व जामीन अर्ज. (Except POCSO & Rape Cases) | बीड शहर, पेठ बीड, बीड ग्रामीण, |
| 2 | मा. श्रीमती जे. आर. पुलाटे, जिल्हा न्यायाधीश–2 तथा अति. सत्र न्यायाधीश, बीड | विशेष व भा.दं.वि, बी.एन.एस.एस. प्रमाणे दाखल होणारे नियमीत व अटकपुर्व जामीन अर्ज. | शिवाजीनगर, पिंपळनेर, नेकनूर, सायबर पो.स्टे. |
| 3 | मा. श्री. आर. एस. पवार, जिल्हा न्यायाधीश–3 तथा अति. सत्र न्यायाधीश, बीड | विशेष व भा.दं.वि, बी.एन.एस.एस. प्रमाणे दाखल होणारे नियमीत व अटकपुर्व जामीन अर्ज. (Except POCSO & Rape Cases) | गेवराई, अंमळनेर |
| 4 | मा. श्री. एस. एस. घोरपडे, जिल्हा न्यायाधीश–4 तथा अति. सत्र न्यायाधीश, बीड | महिला अत्याचार प्रतिबंध कायद्याचे नियमित, अटकपुर्व जामीन व रिमांड. (including Rape Cases) | सत्र न्यायालय, बीड चे न्यायिक कार्यक्षेत्रातील सर्व पोलीस ठाणे. |
| 5 | मा. श्री. डी. बी. बांगडे, विशेष न्यायाधीश पोक्सो कोर्ट, (तदर्थ जिल्हा न्यायाधीश, बीड) | बाल लैंगीक अत्याचार प्रतिबंध कायदा (POCSO) Act | सत्र न्यायालय, बीड चे न्यायिक कार्यक्षेत्रातील सर्व पोलीस ठाणे. |
| 6 | मा. श्रीमती एम. एस. कुलकर्णी, तदर्थ जिल्हा न्यायाधीश–1 तथा अति. सत्र न्यायाधीश, बीड | विशेष व भा.दं.वि, बी.एन.एस.एस. प्रमाणे दाखल होणारे नियमीत व अटकपुर्व जामीन अर्ज. (Except POCSO & Rape Cases) | आष्टी, तलवाडा, अंभोरा |
| 7 | मा. श्रीमती व्ही. पी. पाटील, तदर्थ जिल्हा न्यायाधीश–2 तथा अति. सत्र न्यायाधीश, बीड | विशेष व भा.दं.वि, बी.एन.एस.एस. प्रमाणे दाखल होणारे नियमीत व अटकपुर्व जामीन अर्ज. (Except POCSO & Rape Cases) | चकलांबा, शिरूर कासार, पाटोदा |

सार्वजनिक सुट्टीचे दिवशी रिमांड कामाचा कार्यभार खालील प्रमाणे राहील.

| अ.क | रिमांडचे काम ठेवण्यात आलेल्या न्यायालयाचे नांव | दिनांक |
|---|---|---|
| 1 | मा. श्रीमती एस. आर, शिंदे,<br>जिल्हा न्यायाधीश–1 व अति. सत्र न्यायाधीश, बीड | ..... |
| 2 | मा. श्रीमती जे. आर. पुलाटे,<br>जिल्हा न्यायाधीश–2 व अति. सत्र न्यायाधीश, बीड | 22/11/2026 |
| 3 | मा. श्री. आर. एस. पवार,<br>जिल्हा न्यायाधीश–3 व अति. सत्र न्यायाधीश, बीड | 12/11/2026, 13/11/2026 |
| 4 | मा. श्री. एस. एस. घोरपडे,<br>जिल्हा न्यायाधीश–4 व अति. सत्र न्यायाधीश, बीड | 11/11/2026, 28/11/2026 |
| 5 | मा. श्री. डी. बी. बांगडे, विशेष न्यायाधीश पोक्सो कोर्ट,<br>(तदर्थ जिल्हा न्यायाधीश, बीड) | 08/11/2026, 09/11/2026,<br>10/11/2026 |
| 6 | मा. श्रीमती एम. एस. कुलकर्णी,<br>तदर्थ जिल्हा न्यायाधीश–1 व अति. सत्र न्यायाधीश, बीड | 01/11/2026, 15/11/2026 |
| 7 | मा. श्रीमती व्ही. पी. पाटील,<br>तदर्थ जिल्हा न्यायाधीश–2 व अति. सत्र न्यायाधीश, बीड | 14/11/2026, 29/11/2026 |

1. सार्वजनिक सुट्टीचे दिवशी रिमांडचे काम हे दुपारी 02.45 ते 4.00 वाजेपर्यंत करावे. रिमांड कामकाजासाठी संबंधीत न्यायीक अधिका–यांनी त्यांचे न्यायालयातील आवश्यक असलेल्या वर्ग–3 व वर्ग–4 च्या कर्मचा–यांची नेमणुक करावी. तसेच वरील दिवशी जर संबंधीत न्यायिक अधिकारी मुख्यालयी हजर नसतील तर रिमांडचे काम त्यांचे प्रभारी अधिकारी यांनी पहावे.

2. ज्या गुन्हयातील दोषारोपपत्र या न्यायालयात दाखल नसेल अशा गुन्हा रजि. कमांक मधील प्रथम अटकपुर्व किंवा नियमीत जामीन अर्ज वरील आदेशाप्रमाणे वर्ग होतील. परंतु, पहिला अटकपूर्व किंवा नियमीत जामीन अर्ज दाखल होवून निकाली निघाला व त्याच गुन्हयातील त्याच किंवा इतर आरोपींचा जामीन अर्ज दाखल झाला तर त्याच न्यायालयाकडे वर्ग करावा.

3. ज्या गुन्हयातील दोषारोपपत्र या न्यायालयात दाखल नसेल अशा गुन्हा रजि. कमांक मधील पहिला नियमीत जामीन अर्ज ज्या न्यायालयाने निकाली काढला असेल आणि त्याच आरोपीचे नंतर येणारे नियमीत जामीन अर्ज हे त्याच न्यायालयाकडे वर्ग होतील.

4. जर एखादया न्यायालयाने अटकपुर्व किंवा नियमीत जामीन अर्ज निकाली काढला असेल व ते न्यायिक अधिकारी सध्या बदलुन गेले असतील किंवा सेवानिवृत्त झाले असतील व त्याच आरोपीचे पुन्हा अटकपुर्व किंवा नियमीत जामीन अर्ज दाखल झाले तर ते अर्ज उपरोक्त आदेशाप्रमाणे वर्ग करण्यात येतील.

5. ज्या गुन्हयातील दोषारोपपत्र या न्यायालयात दाखल असेल अशा प्रकरणातील जामीन अर्ज हे ज्या न्यायालयात दोषारोपपत्र प्रलंबीत आहे त्या न्यायालयाकडे वर्ग होतील.

6. ज्या गुन्हयातील दोषारोपपत्र या न्यायालयात दाखल असेल व आरोपी हा फरार असेल अशा प्रकरणातील अटकपुर्व जामीन अर्ज/नियमीत जामीन अर्ज हे ज्या न्यायालयात दोषारोपपत्र प्रलंबीत आहे त्या न्यायालयाकडे वर्ग होतील.

7. अधिक्षक, राज्य उत्पादन शुल्क, बीड यांचे कडील दाखल होणा–या गुन्हयामधील जामीन अर्ज हे ज्या पोलीस स्टेशनच्या अधिकार क्षेत्रात गुन्हा घडला असेल व ते पोलीस स्टेशन ज्या न्यायालयाकडे ठेवण्यात आले आहे त्या न्यायालयाकडे वर्ग होतील.

सदरील आदेश दिनांक 1 नोव्हेंबर, 2026 पासून पुढील आदेशापर्यंत लागू राहतील.

(दिनेश पी. सुराणा)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, बीड.